वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शुक्रवार दि. १४ फेब्रुवारी २०२५ पाने ४ किंमत ३

# धनंजय मुंडे, सुरेश धस यांच्यातील वैर मिटला?

## चार दिवसांपूर्वी सुरेश धस-धनंजय मुंडेंची गुप्त भेट? कळू नये म्हणून खासगी हॉस्पिटल निवडले, कोणी मध्यस्थी केली?



बीड, (दिव्य न्युज):-गेल्या दोन महिन्यांपासून मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येमुळे अडचणीत आलेले धनंजय मुंडे आणि त्यांना अडचणीत आणणारे सत्तापक्षाचेच आमदार सुरेश धस यांच्यात समेट झाल्याची चर्चा सुरु झाली आहे. या दोघांची गुप्तपणे भेट घडवून आणण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. ही भेट खुद्द भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनीच घडवून आणल्याचे सांगितले जात आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरणात मुंडेंचा निकटवर्तीय वाल्मिक कराड हा तुरुंगात आहे. याचा आका हे मुंडे असल्याचे आरोप धस यांनी केले होते. तसेच मुंडे यांच्या विरोधात सातत्याने धस यांनी आवाज उठविला होता. बीडमधील दहशतवाद मोडून काढण्याची भाषा धस यांनी केली होती. मुंडेंचा राजीनामाही त्यांनी मागितला होता. अशातच मुख्यमंत्री फडवीस यांचीही त्यांनी भेट घेतली होती. यानंतरही धस यांनी मुंडेंवर आरोप करणे सुरुच ठेवले होते. परंतू, आता या भेटीमुळे धस आणि मुंडे यांच्यातील वैर संपल्याची चर्चा सुरु झाली आहे.

मुंडे आणि धस यांची भेट एखा खासगी रुग्णालयात घडवून आणण्यात आल्याचे वृत्त एबीपी माझाने दिले आहे. महत्वाचे म्हणजे बावनकुळे यांनीही ही भेट मान्य केली ▸▸ पान २ वर

### अंजली दमानियांची पहिली प्रतिक्रिया

तर अंजली दमानिया म्हणाल्या की, मला देखील चार ते पाच दिवसांपूर्वी असं समजलं होतं की, दोघांची भेट झाली. मात्र, मला असं सांगण्यात आलं होतं चंद्रशेखर बावनकुळे यांनी मध्यस्थी केली. पण अशी भेट झाली असेल तर फार दुर्दैवी आहे. कारण आता सुरेश धस मग त्यांच्याविरोधात लढतील की नाही? हे सर्व मला विक्षिप्त वाटतं आहे. आकाचा आका आहे वगैरे बोलत होते. आताच्या घडीला हे समोर येत असेल तर कठीण आहे. हे अतिशय चुकीचं आहे.

Email:- dailydivyawarta@Gmail.com Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

नशीब, अडीच महिन्यांनी तरी धनंजय मुंडेंचा 'फड' गाजला

## परळीच्या उदरात आणखी काय दडलयं?

परळी , (दिव्य न्युज):- परळी विधानसभा मतदारसंघातील एका मतदान केंद्रावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्याशी अरेरावी आणि त्यांच्या कार्यकर्त्याला मारहाण केल्याप्रकरणी मंत्री धनंजय मुंडे यांचा समर्थक कैलास फड याच्यासह सात जणांवर गुन्हा दाखल झाला आहे. हा व्हिडीओ मतदानाच्या दिवशीच व्हायरल झाला होता, मात्र गुन्हा अडीच महिन्यांनंतर दाखल झाला आहे.

साधारण अडीच महिन्यांपूर्वीचा मतदान केंद्रावरील प्रसंग आहे. तरुणांचे टोळके हुल्लडबाजी करत आहे, दादागिरी करत काही मतदारांना केंद्रात जाण्यासाठी रोखत आहे. विरोधी उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्याशी अरेरावी करत आहे, त्यांच्या कार्यकर्त्याला बेदम मारहाण करत आहे... हे चित्र आहे महाराष्ट्राच्या २०२४ च्या विधानसभा निवडणुकीतले. विश्वास बसत नाही ना? पण हे खरे आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री धनंजय मुंडे यांच्या परळी मतदारसंघातील एका मतदान केंद्रावर असा प्रकार घडला होता. असे सांगितले जाते की, असे प्रकार अनेक मतदान केंद्रांवर घडले होते, मात्र व्हिडीओ एकच व्हायरल झाला.

विधानसभा निवडणुकीसाठी मतदान झाले त्या दिवशीचा हा व्हिडीओ खूप व्हायरल झाला होता. असा प्रकार महाराष्ट्रातही घडू शकतो, हे पाहून लोकांना धक्का बसला होता. निवडणूक आयोग, पोलिस आणि प्रशासनाने त्यावेळी त्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई केली नाही, हा त्यापेक्षा मोठा धक्का होता. आता अडीच महिन्यांनी याप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचा कार्यकर्ता कैलास फड याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. कैलास फड हा वाल्मिक कराडचा ▸▸ पान २ वर

## संजय गांधी, श्रावणबाळ योजनेतील निराधारांचे अनुदान तात्काळ वितरीत करा

### आ.संदीप क्षीरसागरांचे तहसिलदारांना निर्देश



बीड , (दिव्य न्युज):- संजय गांधी, श्रावणबाळ, इंदिरा गांधी या व अशा प्रकारच्या सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे अनुदान तात्काळ वितरीत करण्याचे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड व शिरूर कासार तहसिलदार यांना दिले आहेत.

बीड विधानसभा मतदारसंघातील बीड शहर, बीड ग्रामीण व शिरूर कासार तालुक्यातील लाभार्थ्यांना गेल्या अनेक दिवसांपासून संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजना या सामाजिक ▸▸ पान २ वर

## आ.संदीप क्षीरसागरांकडून बीडच्या महत्त्वाच्या प्रश्नावर औरंगाबादमध्ये बैठका

### एमआयडीसी, महामार्ग प्राधिकरणाच्या विभागीय कार्यालयात

औरंगाबाद (दिव्य न्युज):- बीडच्या अतिशय महत्त्वाच्या प्रश्नांवर आ.संदीप क्षीरसागर यांनी शुक्रवारी (दि.१४) एमआयडीसी आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या विभागीय कार्यालयात बैठका घेतल्या. यावेळी बीड येथील एमआयडीसीचा विकास आणि बीडच्या बायपासवरील स्लीप सर्व्हिस रोड व





उड्डाणपूलांच्या विषयावर सविस्तर चर्चा झाली. बीड जिल्ह्याचा औद्योगिक ▸▸ पान २ वर

## अंबाजोगाई बसस्थानकावर गर्दीचा फायदा घेत सोनसाखळी व पर्स चोरी

अंबाजोगाई, (दिव्य न्युज):- शहरातील बसस्थानक परिसरात गर्दीचा फायदा घेत प्रवाशांचे दागिने व रोख रक्कम चोरीच्या घटना समोर आल्या आहेत. दिनदयाळ कॉलनी येथील रहिवासी व खोलेश्वर महाविद्यालयातील प्राध्यापक सतिष सुरेशराव हिवरेकर यांनी पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचे मेव्हणे श्री. राजेंद्र मधुकरराव पानसरे (रा. फरांदेनगर, नांदेड) हे अंबाजोगाई येथे आले होते. त्यांना लातूरला जाण्यासाठी बसस्थानकावर सोडण्यासाठी प्राध्यापक हिवरेकर व त्यांचा चुलत भाऊ निलेश हिवरेकर दुपारी ४ वाजता बसस्थानकात गेले.

मेव्हणे बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील अंदाजे १७-१८ ग्रॅम वजनाची सोनसाखळी चोरी केली. घटनेनंतर बसमध्ये तसेच परिसरात चोराचा शोध घेतला असता कोणताही संशयित आढळून आला नाही.याच दरम्यान, सय्यद आलिमा अकबर (रा. धानोरा खुर्द) या युवतीची देखील पर्स चोरीला गेल्याचा प्रकार उघडकीस आला. अंबाजोगाई-आपेगाव बसमध्ये चढत असताना अज्ञात व्यक्तीने त्यांच्या पर्सची चोरी केली. सदर पर्समध्ये १,००० रुपये रोख, बस पास, एटीएम कार्ड, पॅन कार्ड, आधार कार्ड व पोस्ट डेबिट कार्ड होते.या दोन्ही घटनेची तक्रार प्राध्यापक सतिष हिवरेकर व सय्यद आलिमा अकबर यांनी पोलीस ठाण्यात दाखल केली आहे. गर्दीचा फायदा घेत बसस्थानक परिसरात चोरीच्या घटना वाढत असल्याने प्रवाशांनी सावधगिरी बाळगावी, असे आवाहन करण्यात आले आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत.

जेपीसी अहवालाता खुलासा; वक्फ बोर्डाने मनमानीपणे कायदा मोडला

## कुतूबमिनारसारखी २८० स्मारके मालमत्ता; वक्फचा होता दावा

नवी दिल्ली, (वृत्तसेवा):- संसदेत सादर केलेल्या संयुक्त संसदीय समितीच्या (जेपीसी) अहवालात असे दिसून आले आहे की देशातील राष्ट्रीय महत्त्वाची सुमारे २८० स्मारके वक्फ बोर्डाची मालमत्ता म्हणून घोषित करण्यात आली आहेत. यातील बहुतेक स्मारके राजधानी दिल्लीत आहेत.

कुतुबमिनार, फिरोजशाह कोटला, पुराण किल्ला, हुमायूनचा मकबरा, जहांआरा बेगमचा मकबरा, कुतुबमिनार परिसरातील लोखंडी स्तंभ आणि इल्तुतमिशचा मकबरा यासारख्या स्मारकांवरही वक्फचा दावा आहे.समितीच्या सुनावणीदरम्यान, भारतीय पुरातत्व सर्वेक्षणने या स्मारकांची यादी सादर केली होती.याशिवाय, नगरविकास मंत्रालयाने समितीला सांगितले ▸▸ पान २ वर

### नवीन वक्फ कायद्यामुळे काय बदल होतील...

वक्फ मालमत्ता म्हणजे मुस्लिमांनी धार्मिक किंवा धर्मादाय कारणांसाठी दान केलेली मालमत्ता. या कायद्यानुसार, नोंदणीकृत मालमत्ता विकता येत नाही किंवा तिची मालकी बदलता येत नाही, परंतु नवीन कायद्यामुळे अनेक गोष्टी बदलतील, जसे की...

१.पूर्वी वक्फ कायदा, १९९५ असे म्हटले जात असे. पुढे त्याला एकीकृत वक्फ व्यवस्थापन, सक्षमीकरण, कार्यक्षमता आणि विकास कायदा असे म्हटले जाईल.

२.पूर्वी, वक्फ जमिनीवर दावा करणारी व्यक्ती वक्फ ट्रिब्युनलमध्ये अपील करू शकत होती, परंतु आता तो न्यायालयातही अपील करू शकतो.

३.पूर्वी, न्यायाधिकरणाच्या निर्णयाला आव्हान देता येत नव्हते, परंतु आता उच्च न्यायालयात आव्हान देता येते.

४.पूर्वी, मशीद बांधण्यासाठी किंवा इस्लामिक उद्देशांसाठी वापरलेली जमीन वक्फची होती. आता फक्त दान केलेली जमीन वक्फ असेल, जरी त्यावर मशीद असली तरीही.

५. यापूर्वी महिला आणि इतर धर्माचे लोक वक्फ बोर्डाचे सदस्य असू शकत नव्हते. आता दोन महिला आणि दोन बिगर मुस्लिम सदस्य असणे आवश्यक आहे.

६. मालमत्ता वक्फ आहे की नाही हे राज्य सरकारने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याद्वारे ठरवले जाईल.

७.वक्फ कायद्यांतर्गत आधीच नोंदणीकृत असलेल्या मालमत्तांवर परिणाम होणार नाही. ज्यांची नोंदणी झालेली नाही ते नवीन मानकांचे पालन करतील.

८.ज्यांना बोर्डाला जमीन दान करायची आहे त्यांना ते गेल्या ५ वर्षांपासून इस्लाम धर्माचे पालन करत असल्याचे जाहीर करावे लागेल.




## संतोष देशमुखांच्या पत्नी अश्विनी देशमुखांना नोकरी आडस विद्यालयात कनिष्ठ लिपिक पदावर नियुक्ती

बीड , (दिव्य न्युज):- मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांना केजमधील शिक्षण संस्थेत नोकरी देण्यात आली आहे. केज तालुक्यातील आडस गावातील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात कनिष्ठ लिपिक पदाची नोकरी त्यांना नोकरी देण्यात आली आहे. ही शिक्षण संस्था रमेश आडसकर यांची आहे.

रमेश आडसकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी संतोष देशमुखांच्या घरी जाऊन अश्विनी देशमुख यांना नियुक्ती



पत्र दिलं. संतोष देशमुखांची हत्या झाल्यानंतर त्यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांना सरकारी नोकरी देण्यात यावी अशी मागणी सातत्याने करण्यात येत होती. आता त्यांना आडसमधील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाल नोकरी देण्यात आली आहे.संतोष देशमुखांची ९ डिसेंबर २०२४ रोजी हत्या करण्यात आली. या हत्येमागे वाल्मिक कराड टोळीचा हात असल्याचं समोर आलं. त्यामधील सहा आरोपी आता गजाआड असून एक आरोपी, कृष्णा आंधळे हा अद्याप फरार आहे. वाल्मिक कराड हा राज्याचे ▸▸ पान २ वर

# ‘तिरूमला’ तून चोरी

## अनेकदा साहित्याची चोरी;प्रथमच गुन्हा दाखल

बीड, (दिव्य न्युज):- ठेवीदारांची फसवणूक केल्याने ज्ञानराधा मल्टिस्टेटचा अध्यक्ष सुरेश कुटे हा जेलमध्ये आहे. त्यानंतर पोलिसांनी त्याच्यासह पत्नी अर्चना कुटेच्या नावे असलेल्या सर्व मालमत्ता सील केल्या होत्या. त्या जप्त आहेत. त्यावर लक्ष ठेवण्यासाठी कोणीही नसल्याने चोरट्यांनी डाव साधत महागडे साहित्य लंपास केले होते. याबाबत कथित व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतरही पोलिसांनी काहीच कारवाई केली नव्हती. आता पुन्हा जनरेटर घेऊन जाताना लोकांनीच पकडले. त्यामुळे पेठबीड पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेतला.



बीडमधील सुरेश कुटे यांनी ज्ञानराधा मल्टिस्टेट, तर अर्चना कुटे यांनी तिरूमला ग्रुपची उभारणी केली. तिरुमला ग्रुपचे वेगवेगळे प्रॉडक्ट राज्यासह परराज्यातही जात होते, तर ज्ञानराधाच्याही ५२पेक्षा जास्त शाखा आहेत. यात लाखो ठेवीदारांच्या हजारो कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. लोकांना जादा व्याजदराचे आमिष दाखवून या ठेवी घेतल्या; परंतु नंतर त्या परत मिळत नसल्याने ठेवीदारांनी न्यायालयात, प्रत्यक्षात पोलिस ठाण्यात धाव घेत गुन्हे दाखल केले. त्याप्रमाणे बीडसह इतर जिल्ह्यात सुरेश कुटेसह इतरांविरोधात गुन्हे दाखल केले. याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे आहे. त्यांनी मालमत्ता जप्त केल्या. परंतु तेथे बंदोबस्तासाठी कोणीही नव्हते. याचा गैरफायदा घेत काही धनदांडगे तिरूमला ग्रुपच्या परिसरातून महागड्या मशिनरी क्रेनद्वारे कंटेनर, ट्रकमध्ये टाकून चोरी करत होते. याचे कथित व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. कारवाई झाली नव्हती.

### नागरिकांनी रंगेहाथ पकडले

१२ फेब्रवारी रोजीदेखील १२ लाख रुपयांचे जनरेटर टेम्पोतून चोरून नेले जात होते. याची माहिती लोकांना समजली. त्यांनी त्याला रंगेहाथ पकडले. त्यानंतर पेठबीड पोलिसांनी धाव घेत त्यांना ताब्यात घेतले. आता याप्रकरणी सुधाकर त्र्यंबकराव गिते (३८, रा. आयोध्यानगर, परळी) व अमोल उद्धव ढेंगे (३१, रा. वंजारवाडी, ता. बीड) यांच्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. सुरेश कुटे यांचा बंधू सदाशिव कुटे यांनी फिर्याद दिली आहे.

# सांगली येथील पत्रकार प्रसाद पिसाळ यांच्या हल्ल्याविरोधी वडवणीमध्ये पोलीस स्टेशनला निवेदन



वडवणी, (दिव्य न्युज):- महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई चे संस्थापक संजयजी भोकरे साहेब यांच्या आदेशानुसार प्रदेश अध्यक्ष गोविंद वाकडे यांच्या सुचनेनुसार व प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी सर यांचे मार्गदर्शनाखाली शाखा वडवणी तालुका यांच्या वतीने सांगली जिल्ह्यातील विटा येथील पत्रकार प्रसाद पिसाळ यांच्या वर सत्य बातमी दिल्याचा राग मनात धरून कोयत्याने जीव घेणा हल्ला केल्याची घटना घडली आहे तरी या घटनेचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा वडवणी तालुका, डिजिटल मिडिया वडवणी तालुका, पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती वडवणी तालुका यांच्या वतीने सहाय्यक पोलीस निरीक्षक अमन सिरसट साहेब व तहसीलदार वडवणी यांना लेखी निवेदन देऊन आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांच्या कडे केली आहे व या घटनेचा जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला आहे यावेळी आंदोलनात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा वडवणी तालुका मार्गदर्शक अँड विनायक जाधव, वडवणी तालुका अध्यक्ष अशोक राव निपटे, उपाध्यक्ष शांतीनाथ जैन, अर्जुन मुंडे सचिव, शंकर झाडे कोषाध्यक्ष, डिजिटल मिडिया वडवणी तालुका अध्यक्ष सतिष राव मुजमुले, उपाध्यक्ष शेख एजाज, सचिव अशोक राव फपाळ, अंकुश गवळी कोषाध्यक्ष, पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती वडवणी तालुका अध्यक्ष प्रा.श्रीनिवास काकडे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर लंगे, सचिव गंगाभिष्म आंडील सर, कोषाध्यक्ष शंकर जाधव, सदस्य बबलू कदम इत्यादी उपस्थित होते...

पान १ वरून

## परळीच्या उदरात

निकटवर्तीय आहे. वाल्मिक कराड हा राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय आहे.विधानसभा निवडणुकीसाठीचे मतदान २० नोव्हेंबर रोजी झाले. त्यांनंतर ९ डिसेंबर रोजी मस्साजोगचे (ता. केज, जि. बीड) सरपंच संतोष देशमुख यांची अमानुषपणे मारहाण करून हत्या करण्यात आली. जनरेटा वाढल्यामुळे त्या प्रकरणात वाल्मिक कराड याच्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला. त्याच्यावर 'मकोका' लावण्यात आला आहे. संतोष देशमुख यांच्या खुनाचा विषय राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड, भाजपचे आमदार सुरेश धस यांनी सभागृहात उपस्थित केला होता. त्यामुळे कारवाई आणि पोलिसांचा तपासही पुढे सरकला.

मतदानाच्या दिवशी जो प्रकार मतदान केंद्रावर घडला, त्या प्रकरणात कैलास फड या गुंडावर गुन्हा दाखल करण्यासाठी अडीच महिने का लागले, याचे उत्तर निवडणूक आयोग, प्रशासन, पोलिस आणि तात्पर्याने सरकारला द्यावे लागणार आहे. व्हायरल झालेला व्हिडीओ निवडणूक आयोगापर्यंत, पोलिसांपर्यंत पोहोचला नसेल, असे कसे म्हणता येईल? घटनास्थळावर पोलिस अधिकारी, कर्मचारी होते, हे त्या व्हिडीओत दिसत होते. पोलिसांच्या समोर हुल्लडबाजी झाली, विरोधी उमेदवाराला शिवीगाळ, कार्यकर्त्याला मारहाण झाली, तरीही गुन्हा दाखल का झाला नाही? सरकारकडे याचे काय उत्तर आहे?

संतोष देशमुख यांच्या हत्येचे प्रकरण गाजले नसते, आमदार आव्हाड आणि आमदार धस यांनी ते प्रकरण लावून धरले नसते तर काय झाले असते? उत्तर सोपे आहे, कैलास फड याच्यावर गुन्हा दाखल झाला नसता, असे म्हणायला वाव आहे. परळी मतदारसंघातून धनंजय मुंडे यांच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून राजेसाहेब देशमुख रिंगणात उतरले होते. मतदानाच्या दिवशी त्या केंद्रावर धनंजय मुंडे यांचा समर्थक कैलास फड हा पोलिसांच्या समोर देशमुख यांच्याशी हुज्जत घालत असल्याचे, त्यांच्याशी अरेरावी करत असल्याचे व्हिडीओत दिसत होते.

## संजय गांधी, श्रावणबाळ

अर्थसहाय्य योजनांचे अनुदान मिळालेले नाही. या योजनेचे लाभार्थी म्हणजे गरजू, निराधार आणि दुर्बल असतात. त्यांचे जीवनमान या अनुदानावर अवलंबून असते. त्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून या योजनांचे लाभार्थ्यांना अनुदान मिळाले नसल्याने मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे सदरील योजनेच्या लाभार्थ्यांना त्यांना मिळणाऱ्या अनुदानाची रक्कम तात्काळ वितरीत करा असे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड व शिरूर कासारचे तहसिलदार यांना दिले आहेत.

## आ.संदीप क्षीरसागरांकडून

विकास होण्यासाठी नवनवीन उद्योग बीडमध्ये यावे लागतील. त्यामुळे सर्वप्रथम बीड शहरात असलेल्या एमआयडीसीचा विकास होणे अत्यंत गरजेचे आहे. ही बाब लक्षात घेऊन आ.संदीप क्षीरसागर यांचा, बीडच्या एमआयडीसीच्या विकासाबाबत सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. गेल्या आठवड्यातच आ.क्षीरसागर यांनी बीड येथील शासकीय विश्रामगृहात औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकार्यांसमवेत बैठक घेतली होती. यानंतर आता पुन्हा छत्रपती संभाजी नगर येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या विभागीय कार्यालयात आ.क्षीयसागर यांनी याच विषयावर बैठकप घेऊन एमआयडीच्या वरिष्ठ अधिकार्यांसमवेत सविस्तर चर्चा केली. यासोबतच बीडच्या बाह्यवळण रस्ता म्हणजेच बायपासवर उड्डाणपूल नसल्यामुळे नियमितपणे अपघात होत होते. तसेच स्लीप सर्व्हिस रोड नसल्यामुळे नागरिकांना वाहतुकीसाठी मोठी अडचण निर्माण झाली होती. याबाबतही आ.संदीप क्षीरसागरांनी शासन, प्रशासन आणि न्यायालयात पाठपुरावा करून हा प्रश्न मार्गी लावला. आता बीडच्या बायपासवर महालक्ष्मी चौक, जिरेवाडी व छत्रपती संभाजी महाराज चौक, समनापूर या दोन्ही ठिकाणी उड्डाणपूल आणि परळी रोड, नाथापूर रोड, इमामपूर रोड या ठिकाणांवर स्लीप सर्व्हिस रोडच्या कामाची निविदा प्रक्रिया सुरू आहे. याबाबतचा आढावाही आ.संदीप क्षीरसागर बैठकीत घेतला. संभाजीनगर येथे झालेल्या एमआयडीसीच्या बैठकीस माजी आ.सय्यद सलीम, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती सोनाली मुळे तसेच इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. तर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या बैठकीस माजी आ.सय्यद सलीम, प्रकल्प संचालक श्री.रवींद्र इंगोले यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

## कुतूबमिनारसारखी

की, भू-विकास विभागाच्या १०८ मालमत्ता आणि डीडीएच्या १३० मालमत्ता वक्फच्या ताब्यात देण्यात आल्या आहेत. वक्फने नंतर या स्मारकांवर आपला दावा सांगितला.एकेकाळी वक्फ बोर्डाकडे देशात ५२ हजार नोंदणीकृत मालमत्ता होत्या. आज ९.४ लाख एकर जमिनीवर ८.७२ लाख स्थावर मालमत्ता आहेत.

स्मारकांमध्ये दुकाने बांधली, भाडे मिळवले एएसआयने जेपीसीला असेही सांगितले की वक्फ बोर्डाने आम्हाला स्मारकांचे जतन करण्याची परवानगी दिली नाही. आपल्या इच्छेनुसार तिथे बदल केले. पुरातत्व कायदा मोडला गेला. गोपनीयतेच्या नावाखाली, स्मारकांमध्ये प्रवेश थांबवण्यात आला. तिथे छायाचित्रण, गाइड आणि स्मृतिचिन्हे विकण्याची परवानगी देण्यात आली. मूळ रचना बदलून बांधकाम केले. दुकाने बांधली गेली आणि भाड्याने दिली गेली.

## संतोष देशमुखांच्या

मंत्री धनंजय मुंडे यांच्या जवळचा असल्याने मुंडे यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी सातत्याने करण्यात येत आहे.संतोष देशमुख हत्याप्रकरणातील आरोपींची बी टीम बीडमध्ये कार्यरत असल्याचा आरोप संतोष देशमुखांचे बंधू धनंजय देशमुखांनी केला आहे. त्या बी टीमची अद्याप कोणतीही चौकशी झाली नसल्याचाही आरोप धनंजय देशमुखांनी केला. ही बी टीम कोण चालवतं हे सर्वांना माहित आहे असं म्हणत त्यांनी घनंजय मुंडे यांच्याकडे अप्रत्यक्ष निर्देश केल्याची चर्चा आहे.

सुदर्शन घुलेचे व्हॉईस सँपल तपासणार

संतोष देशमुख प्रकहत्यारणातील आरोपी सुदर्शन घुले याची पुन्हा सीआयडीने कस्टडी घेतली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणाला पूरक खंडणी प्रकरणाचा गुन्हा आहे आणि या खंडणी प्रकरणांमध्ये सुद्धा सुदर्शन घुले याच्यावर गुन्हा दाखल झाला होता. मात्र या प्रकरणात अद्याप सुदर्शन घुले याची चौकशी झाली नव्हती. म्हणून न्यायालयीन कोठडीत असलेल्या सुदर्शन घुलेला पुन्हा पोलिस कस्टडीमध्ये घेण्यात आले आहे.

खंडणीच्या गुन्ह्यामध्ये यापूर्वीच वाल्मीक कराड आणि विष्णू चाटे ची चौकशी झाली आहे. मात्र सुदर्शन घुलेची चौकशी होणे बाकी होते. या पोलिस कस्टडीमध्ये सुदर्शन घुलेचे व्हाईस सॅम्पल घेतले जाणार आहेत. सध्या सुदर्शन घुलेला केज शहर पोलिस स्टेशनमध्ये ठेवण्यात आले आहे.

पान ४ वरून

## परभणीतील पथविक्रेत्यांना

आहे, असा आरोप करत या समितीने या निवेदनाच्या माध्यमातून आयुक्तांनी या प्रकरणी फेरीवाले यांच्यासंदर्भात कायदेशीररित्या संरक्षणाची जबाबदारी घ्यावी अशी मागणी केली आहे. या निवेदनावर सय्यद मोईनुद्दीन, शेख सलीम शेख मोईनुद्दीन, सुरेश प्रधान, रामेश्वर आवरगंड, जुबेर युनूस, सचिन अंबिलवादे, साजिद सलीम, गौतम भराडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## सलीम अध्यक्ष युवा मंच

युवकांनी रक्तदान शिबिररात रक्तदान केले हार रक्तदान शिबिर निमित्त बीड शहरातील राजकीय सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी भेटी देऊन शुभेच्छा दिल्या हे रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी सलीम अध्यक्ष यांच्यासह त्यांच्या मित्र परिवाराने हा रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी प्रचंड मेहनत घेतली गेली १६ १७ वर्षापासून सलीम अध्यक्ष युवा मंच तर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते आतापर्यंत हजारो लोकांना या रक्तदानात शिबिरामुळे रक्ताचा कधीही रात्री अपरात्री त्रास झाला नाही समाजसेवक सलीम अध्यक्ष हे नेहमी रुग्णसेवकांसाठी तत्पुर असतात त्यांच्या या कार्याला अनेक सामाजिक राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी कौतुकाची थाप देऊन शुभेच्छा दिल्या,व असंख्य सलीम अध्यक्ष युवा मंच सहकार्यांनी रक्तदान यशस्वी केले!

सलीम अध्यक्ष युवा मंच तर्फे १६ १७ वर्षापासून रक्तदान शिबिर आयोजित करण्यात येते सलीम अध्यक्ष युवा मंच आतापर्यंत केलेल्या अनेक सामाजिक कार्याबद्दल त्यांच्या मित्र परिवाराची त्यांना नेहमी पाठबळ मिळालेला आहे त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे!

## मराठा समाजाने शिस्तीने

की पोलिसांवर कारवाई नको जाऊ द्या.. सोडून द्या..त्यांना त्या माऊलीने बरोबर उत्तर दिलं आहे असेही आव्हाड यावेळी म्हणाले.

हे मोर्चा.. मोर्चा.. करतात. यांच्या सरकारसमोर लाखो मराठ्यांचे मोर्चे निघाले ? काय न्याय दिला यांनी मराठा समाजाला ? सरकारला कुठेतरी जरांगे ना बाजूला करायचं आहे. त्याच्यासाठी कोणाला तरी मोठं करायचं असे हे सरकारचे काम चालु आहे असेही आव्हाड यावेळी म्हणाले. माझा स्पष्ट मत होतं की अक्षय शिंदे याला कोर्टाने शिक्षा द्यायला हवी होती. सोमनाथ सूर्यवंशी या मागासवर्गीयाला न्याय देण्यासाठी आम्ही मोर्चे काढायचे? लाखोंचा मोर्चा बघणार नाही तोपर्यंत हे न्याय देणार नाहीत?अक्षय शिंदेचं मी कुठेही गुणगान गायलेलं नाही, तो गुन्हेगार असेल तर त्याला कायद्याने शिक्षा होईल, पण त्याला चार फुटावरून गोळी घालणं हे न्यायाला मान्य नाही, आम्ही म्हणत नाही की अक्षय शिंदेचा खून झाला. स्वतः न्यायाधीश म्हणत आहेत अक्षय शिंदेचा खून झाला, त्याचा एन्काऊंटर झालेला नाही आमचं मत आहे आणि आम्हाला मत मांडण्याचा अधिकार आहे असेही आव्हाड यावेळी म्हणाले.

